17 FEB 2026

पुण्यनगरी

# क्रॉस कंट्रीत शिवाजी विद्यापीठ संघ सांघिक उपविजेता

**कोल्हापूर :** रोहतक (हरियाणा) येथील महर्षी दयानंद विद्यापीठात पार पडलेल्या अखिल भारतीय पुरुष क्रॉसकंट्री स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने उल्लेखनीय यश संपादन केले. देशभरातील १३८ विद्यापीठांच्या १२८६ धावपटूंनी स्पर्धेत सहभाग घेतला होता. या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाने सांघिक उपविजेतपद पटकावले.

स्पर्धेतील वैयक्तिक गटात अभिषेक देवकाते याने उत्कृष्ट धाव घेत चतुर्थ क्रमांक मिळवला, तर अभिनंदन सूर्यवंशी याने पाचवा क्रमांक पटकावून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. चैतन्य रुपनावर याने १४ व्या क्रमांकावर झेप घेत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. संघातील इतर खेळाडूंमध्ये इराप्पा ब्याडगी (३८ वा), प्रवीण कांबळे (५२ वा) आणि सुमंत राजभर (५३ वा) यांनीही सातत्यपूर्ण कामगिरी केली. सर्व खेळाडूंच्या एकत्रित गुणांच्या जोरावर विद्यापीठाला राष्ट्रीय स्तरावर उपविजेतेपद मिळाले. या संघाला प्रशिक्षक प्रकुल पाटील-मांगोरे यांचे तांत्रिक मार्गदर्शन लाभले, तर संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. के. बी. बेल्लद यांनी काम पाहिले. या यशाबद्दल कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी खेळाडूंचे कौतुक केले. क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा संघ सहभागी झाला होता..

1 7 FEB 2026

सकाळ

# विशेष संख्याशास्त्रीय सादरीकरणात 'विवेकानंद', 'वसंतरावदादा'चे यश

कोल्हापूर, ता. १६ : दैनंदिन जीवनातील वास्तव समस्यांवर संख्याशास्त्र उपयुक्त ठरू शकते, याची प्रचिती देणाऱ्या विशेष प्रकल्प सादरीकरण स्पर्धेमध्ये कवठेमहांकाळच्या पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालयाच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला.

शिवाजी विद्यापीठाचा संख्याशास्त्र अधिविभाग आणि विद्यापीठ संख्याशास्त्र शिक्षक संघटनेने 'वास्तव समस्यांचे सांख्यिकीय विश्लेषण' विषयावर कार्यशाळा घेतली. विद्यार्थ्यांसाठी 'माझ्या परिसरातील प्रतिव्यक्ती मासिक वाहन इंधन वापराचा अंदाज' विषयावर स्पर्धा झाली.

स्पर्धेत दहा महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. प्रथम फेरीतून एल. बी. एस. महाविद्यालय (सातारा), पी. डी. व्ही. पी. महाविद्यालय (तासगाव), पी.व्ही. पी. महाविद्यालय (कवठेमहांकाळ), विवेकानंद महाविद्यालय (कोल्हापूर) आणि एस. जी. एम. महाविद्यालय (कऱ्हाड) यांचे संघ अंतिम फेरीसाठी पात्र झाले. विवेकानंद महाविद्यालयाने द्वितीय आणि सद्गुरू गाडगेबाबा महाराज महाविद्यालयाने (कऱ्हाड) तृतीय क्रमांक पटकावला. परीक्षक म्हणून डॉ. शशिभूषण महाडिक, गणेश खटावकर यांनी काम पाहिले. ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. अनिल गोरे, डॉ. महाडिक आणि डॉ. सोमनाथ पवार यांनी मार्गदर्शन केले. डॉ. सुकुमार राजगुरू यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विशेष प्रकल्प सादरीकरण स्पर्धेत कवठेमहांकाळच्या पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालयाच्या संघाला प्रथम क्रमांकांचे बक्षीस मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. शेजारी डॉ. अनिल गोरे, शशिभूषण महाडिक, गणेश खटावकर आदी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ. कोल्हापूर

17 FEB 2026

पुण्यनगरी

# 'मानव्यविद्या'कडून सर्व शाखांना जोडण्याचे काम : देशमुख

**चंदगड : प्रतिनिधी**

मानव्यविद्या शाखेत वेगवेगळ्या प्रकारचे आमूलाग्र बदल होत आहेत. नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षण पद्धतीत नव्या वाटा उपलब्ध झाल्या आहेत. ग्रामीण भागात खूप मोठी निर्मिती क्षमता आहे. सामान्य परिस्थितीतून आलेली माणसे मोठी झालेली आपल्याला दिसतात. आरोग्य, शिक्षण आणि रोजगार या गोष्टींना महत्त्व आहे. याला अनुसरून विद्यार्थ्यांना कौशल्य आणि ज्ञान दिले तर विद्यार्थी प्रगत होईल, असे प्रतिपादन प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले.




**हलकर्णी : एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी गोपाळ पाटील. उपस्थित एम. एस. देशमुख, बी. डी. अजळकर यांच्यासह मान्यवर.**

हलकर्णी (ता. चंदगड) येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर पुरस्कृत, महाविद्यालयातील मानव्यशास्त्र विभाग आणि नॅक विभाग यांच्या वतीने आयोजित 'मानव्य विद्याशाखेतील नवप्रवाह' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेत बीजभाषक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी गोपाळ पाटील होते.

प्राचार्य डॉ. बी. डी. अजळकर यांनी परिषदेचा हेतू स्पष्ट केला. प्रा. पी. ए. पाटील यांनी स्वागत केले. यावेळी शोधनिबंधांचे नियतकालिकाचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी गोपाळराव पाटील म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांनी वाटचाल करावी. जीवनार्थी आणि परीक्षार्थी शिक्षण यामध्ये फरक आहे. शिक्षणाच्या प्रवाहामध्ये विद्यार्थ्यांना पूर्णपणे आणणे गरजेचे आहे. वाचन संस्कृती महत्त्वाची आहे. पुस्तक हे आपले मस्तक घडवते, त्यामुळे पुस्तकाशी सर्वांनी मैत्री करावी, मानव्य विद्याशाखा मानवी जीवनाचे सखोल ज्ञान देत असते.

यावेळी अशोकराव जाधव, संजय पाटील, विशाल पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. चर्चासत्रात प्रा. डॉ. अवनीश पाटील, प्रा. डॉ. एम. एस. नेसरकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. डॉ. एम. एस. नेसरकर, प्रा. डॉ. सी. एम. नाईक, प्राचार्य डॉ. दत्ता पाटील, डॉ. सुरेश शिखरे, डी. आर. माने डॉ. संतोष जेठीथोर, प्राचार्य डॉ. बी. डी. अजळकर, प्रा. पी. ए. पाटील, प्रा. डॉ. राजेश घोरपडे, डॉ. मधुकर जाधव यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. प्रा. डॉ. व्ही. व्ही. कोलकार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. मधुकर जाधव यांनी आभार मानले.

17 FEB 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात पाच माजी विद्यार्थ्यांसोबत सामंजस्य करार

## माजी विद्यार्थ्यांसोबत प्रथमच करार : माझे विद्यार्थी, माझे संशोधक या संकल्पनेवर आधारित केला करार

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान अधिविभागाने एकाचवेळी पाच यशस्वी माजी उद्योजक विद्यार्थ्यांसोबत सामंजस्य करार केला. या करारामुळे विद्यापीठातील चालू शैक्षणिक वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी संशोधनाच्या, रोजगाराच्या आणि प्रशिक्षणाची नवनवीन संधी उपलब्ध होणार आहेत. माझे विद्यार्थी, माझे संशोधक या संकल्पनेवर आधारित अशा प्रकारचा सामंजस्य करार विद्यापीठामध्ये प्रथमच करण्यात आला.

या करारामुळे संशोधक विद्यार्थ्यांना प्रोत्साहन व प्रेरणा मिळणार आहे. हा महत्त्वपूर्ण करार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहामध्ये प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या करारामुळे शिवाजी विद्यापीठ हे केवळ पदव्या देणारे केंद्र न राहता, उद्योजक घडवणारे केंद्र म्हणून समोर येत आहे. विद्यापीठाने ज्या पाच कंपन्यांसोबत हातमिळवणी केली आहे, त्या सर्व कंपन्यांचे नेतृत्व विद्यापीठाचेच माजी विद्यार्थी करत आहेत. अक्षय पाटील (कॅलस बायोटेक प्रायव्हेट लिमिटेड, कोल्हापूर), अजय अदाटे (ॲग्रिकॉस एक्सपोर्ट्स प्रायव्हेट लिमिटेड, पुणे), डॉ. स्वप्नील पाटील (इकोझेनिथ टेक्नॉलॉजी, कोल्हापूर), स्वप्नील देसाई (पेऑन लॅबोरेटरीज एलएलपी, कोल्हापूर), डॉ. पराग कोळेकर (अल्फा नोवोबायोटिक्स, सांगली) अशी त्यांची नावे आहेत. या करारामुळे विद्यार्थ्यांना या कंपन्यांमध्ये कामाचा अनुभव घेता येणार आहे.



'माझे विद्यार्थी, माझे संशोधक' या संकल्पनेवर आधारित शिवाजी विद्यापीठात पाच यशस्वी उद्योजक ठरलेल्या माजी विद्यार्थ्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आला.

### विद्यापीठाच्या इतिहासात माजी विद्यार्थ्यांसोबत पहिलाच करार

"विद्यापीठाच्या इतिहासात माजी विद्यार्थ्यांसोबत इतक्या मोठ्या प्रमाणावर करार होण्याची ही पहिलीच वेळ आहे. आपल्याच विद्यार्थ्यांनी घडवलेल्या उद्योगांसोबत काम करणे ही विद्यापीठासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

**- डॉ. ज्योती जाधव,** प्रभारी प्र-कुलगुरू

▶ पान ४ वर

## विद्यापीठात पाच माजी विद्यार्थ्यांसोबत सामंजस्य करार

▶ पान १ वरून : विद्यापीठातील संशोधक आणि कंपन्यांचे तज्ज्ञ मिळून नव्या उत्पादनांवर संशोधन करतील. गुणवंत विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण झाल्यानंतर या नामांकित कंपन्यांमध्ये रोजगाराची संधी मिळू शकेल. माजी विद्यार्थी आपल्या अनुभवातून सध्याच्या विद्यार्थ्यांना उद्योजकतेचे धडे देतील. कोल्हापूर, सांगली आणि पुणे यांसारख्या शहरांत कार्यरत असणाऱ्या या कंपन्यांमुळे स्थानिक पातळीवर संशोधनाला चालना मिळणार आहे. शिका आणि कमवा यासोबतच ;शिकतानाच उद्योजक व्हा या संकल्पनेला यामुळे बळ मिळणार आहे. याप्रसंगी डॉ. सुषमा पाटील यांनी प्रास्ताविक केले डॉ. दीप्ती कुऱ्हे यांनी आभार मानले.

17 FEB 2026

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात माजी विद्यार्थ्यांसोबत सामंजस्य करार

## 'माझे विद्यार्थी, माझे संशोधक' या संकल्पनेवर प्रथमच हातमिळवणी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान अधिविभागाने एकाचवेळी पाच यशस्वी माजी उद्योजक विद्यार्थ्यांसोबत सामंजस्य करार केला. 'माझे विद्यार्थी, माझे संशोधक' या संकल्पनेवर आधारित अशा प्रकारचा सामंजस्य करार विद्यापीठामध्ये प्रथमच करण्यात आला. हा करार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहामध्ये प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

या करारामुळे शिवाजी विद्यापीठ हे केवळ पदव्या देणारे केंद्र न राहता, उद्योजक घडवणारे केंद्र म्हणून समोर येणार आहे. विद्यापीठाने ज्या पाच कंपन्यांसोबत हातमिळवणी केली आहे, त्या सर्व कंपन्यांचे नेतृत्व विद्यापीठाचेच माजी विद्यार्थी करत आहेत. यामध्ये अक्षय पाटील (कॅलस बायोटेक, कोल्हापूर), अजय अदाटे (अॅग्रीकॉस एक्सपोर्टस्, पुणे), डॉ. स्वप्नील पाटील (इकोझेनिथ टेक्नॉलॉजी, कोल्हापूर), स्वप्नील देसाई (पेऑन लॅबोरेटरीज एलएलपी, कोल्हापूर), डॉ. पराग कोळेकर (अल्फा नोवोबायोटिक्स, सांगली) या कंपन्यांचा समावेश आहे.

या करारामुळे विद्यार्थ्यांना या कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेता येणार आहे. विद्यापीठातील संशोधक आणि कंपन्यांचे तज्ज्ञ मिळून नव्या उत्पादनांवर संशोधन करतील. कोल्हापूर, सांगली आणि पुणे यासारख्या शहरांत कार्यरत असणाऱ्या या कंपन्यांमुळे स्थानिक पातळीवर संशोधनाला चालना मिळणार आहे. 'शिका आणि कमवा' यासोबतच 'शिकतानाच उद्योजक व्हा' या संकल्पनेला यामुळे बळ मिळणार आहे. याप्रसंगी डॉ. सुषमा पाटील यांनी प्रास्ताविक केले, डॉ. दीप्ती कुऱ्हे यांनी आभार मानले.

विद्यापीठाच्या इतिहासात माजी विद्यार्थ्यांसोबत इतक्या मोठ्या प्रमाणावर करार होण्याची ही पहिलीच वेळ आहे. आपल्याच विद्यार्थ्यांनी घडवलेल्या उद्योगांसोबत काम करणे ही विद्यापीठासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

— डॉ. ज्योती जाधव,
प्रभारी प्र-कुलगुरू



कोल्हापूर : यशस्वी माजी उद्योजक विद्यार्थ्यांसोबत सामंजस्य करारप्रसंगी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आदी.

17 FEB 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मानवविद्या शाखांना जोडणारा दुवा

## प्रा.डॉ.एम.एस.देशमुख : मानवविद्येचे नवे क्षितिज उलगडणारी राष्ट्रीय परिषद

**जनप्रवास : हलकर्णी**

मानवविद्याशाखा ही केवळ एका विशिष्ट अभ्यासक्षेत्रापुरती मर्यादित नसून, ती सर्व विद्याशाखांना एकत्र जोडणारा सशक्त दुवा आहे. बदलत्या सामाजिक, शैक्षणिक आणि तांत्रिक प्रवाहांशी सुसंगत असे बहुविषयक शिक्षण विद्यार्थ्यांना दिल्यास त्यांच्यातील क्षमता फुलते आणि व्यक्तिमत्त्व घडते, असे प्रेरणादायी प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील मानव्यविद्याशाखेचे अधिष्ठाता व अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले.

हलकर्णी येथील दौलत विश्वस्त संस्थेच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर पुरस्कृत, मानव्यशास्त्र विभाग व नॅक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'मानव्यविद्याशाखेतील नवप्रवाह' या विषयावर आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेत ते बीजभाषक म्हणून बोलत होते. या परिषदेने शैक्षणिक क्षेत्रात नवविचारांची आणि संशोधनाची नवी दिशा देत संपूर्ण परिसराला वैचारिक समृद्धी बहाल केली.

परिषदेच्या उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी दौलत विश्वस्त संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक गोपाळराव पाटील होते. व्यासपीठावर राणी चन्नम्मा विद्यापीठ, बेळगाव येथील मराठी विभाग प्रमुख प्रा.




व्यासपीठावर बोलताना प्रा डॉ एम एस देशमुख व उपस्थित मान्यवर

डॉ. एम. एस. नेसरकर, शिवाजी विद्यापीठ इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. अवनिश पाटील, इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. सी. एम. नाईक, गडहिंग्लज येथील डॉ. घाळी कॉलेजचे प्राचार्य डॉ. दत्ता पाटील, प्राचार्य डॉ. बी. डी. अजळकर, प्रा. पी. ए. पाटील, प्रा. डॉ. राजेश घोरपडे, समन्वयक डॉ. मधुकर जाधव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

प्रा. डॉ. देशमुख पुढे म्हणाले, "नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल होत आहेत. ग्रामीण भागात अपार निर्मिती क्षमता असून तिला योग्य दिशा देणे गरजेचे आहे. आरोग्य, शिक्षण आणि रोजगार या घटकांशी निगडित कौशल्याधारित शिक्षण दिल्यास विद्यार्थी आत्मनिर्भर आणि प्रगत होऊ शकतो. शिक्षणातून मेहनत, जिद्द आणि ध्येयवादी वृत्ती रुजवली पाहिजे." बहुविषयक दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे हेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

प्राचार्य डॉ. बी. डी. अजळकर यांनी परिषदेचा उद्देश विशद केला. यावेळी देशभरातील विविध विद्यापीठे व महाविद्यालयांतील प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी सादर केलेल्या जवळपास १०० शोधनिबंधांचे दोन खंडांतील नियतकालिक मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. विविध विभागांच्या वतीने सादर करण्यात आलेल्या पोस्टर प्रेझेंटेशनचे उद्घाटनही यावेळी झाले. गोपाळराव पाटील म्हणाले, "या महाविद्यालयातून घडलेले हजारो विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत उच्च पदांवर कार्यरत आहेत, हीच आमच्यासाठी खरी पोचपावती आहे. विद्यार्थ्यांनी जीवनार्थी शिक्षण स्वीकारत वाचनसंस्कृती जोपासावी. पुस्तक हे माणसाचे मस्तक घडवते आणि विचारांना दिशा देते."

ही राष्ट्रीय परिषद तीन सत्रांत संपन्न झाली. प्रथम सत्रात प्रा. डॉ. अवनिश पाटील यांनी आधुनिक काळातील शैक्षणिक बदलांचे विवेचन केले. द्वितीय सत्रात प्रा. डॉ. एम. एस. नेसरकर यांनी बहुविषयक शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले, तर तृतीय सत्रात शोधनिबंधांचे वाचन झाले. समारोप सत्रात प्रा. डॉ. सी. एम. नाईक यांनी संशोधन संस्कृती वृद्धिंगत करण्यावर भर देत परिषदेचे सार मांडले. दौलत विश्वस्त संस्थेचे अध्यक्ष अशोकराव जाधव, उपाध्यक्ष संजय पाटील, सचिव विशाल पाटील, संचालक मंडळ, प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी सहकार्य केले.

मानवविद्येतील नवविचार, संशोधन आणि बहुविषयक शिक्षण यांचा संगम साधणारी ही परिषद शैक्षणिक क्षेत्राला नवी दिशा देणारी आणि ग्रामीण भागातील बौद्धिक क्षितिज विस्तारण्यास प्रेरणा देणारी ठरली, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

17 FEB 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'माझे विद्यार्थी, माझे उद्योजक' सामंजस्य करार

## शिवाजी विद्यापीठ पदव्या देणारे केंद्र न राहता उद्योजक घडवणारे केंद्र होणार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**


शिवाजी विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान अधिविभागाने एकाचवेळी पाच यशस्वी माजी उद्योजक विद्यार्थ्यांसोबत सामंजस्य करार केला. यामुळे विद्यापीठातील चालू शैक्षणिक वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी संशोधन, रोजगार व प्रशिक्षणाची नवनवीन संधी उपलब्ध होणार आहे.

'माझे विद्यार्थी, माझे संशोधक' या संकल्पनेवर आधारित अशा प्रकारचा सामंजस्य करार विद्यापीठात प्रथमच झाला. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहामध्ये प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा करार झाला. करारामुळे शिवाजी विद्यापीठ हे केवळ पदव्या देणारे केंद्र न राहता उद्योजक घडवणारे केंद्र म्हणून समोर येणार आहे.

विद्यापीठाने करार केलेले व



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ जैवतंत्रज्ञान अधिविभाग व माजी उद्योजक विद्यार्थ्यांसोबत सामंजस्य कराराप्रसंगी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. समवेत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी. (छाया : नाज ट्रेनर)**



कंपन्यांचे नेतृत्व विद्यापीठाचे माजी विद्यार्थी करत आहेत. अक्षय पाटील (कॅलस बायोटेक प्रायव्हेट लिमिटेड, कोल्हापूर), अजय अदाटे (अ‍ॅग्रिकॉस एक्सपोर्टस् प्रायव्हेट लिमिटेड, पुणे), डॉ. स्वप्निल पाटील (इकोझेनिथ टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड, कोल्हापूर), स्वप्निल देसाई (पेऑन लॅबोरेटरीज एलएलपी, कोल्हापूर), डॉ. पराग कोळेकर (अल्फा नोवोबायोटिक्स, सांगली) यांचा समावेश आहे.

विद्यापीठातील संशोधक आणि कंपन्यांचे तज्ज्ञ मिळून नव्या उत्पादनांवर संशोधन करतील. गुणवंत विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण झाल्यानंतर या नामांकित कंपन्यांमध्ये रोजगाराची संधी मिळू शकेल. माजी विद्यार्थी आपल्या अनुभवातून सध्याच्या विद्यार्थ्यांना उद्योजकतेचे धडे देतील. कोल्हापूर, सांगली व पुणे यासारख्या शहरांत कार्यरत कंपन्यांमुळे स्थानिक पातळीवर संशोधनाला चालना मिळणार आहे. 'शिका आणि कमवा' यासोबतच 'शिकतानाच उद्योजक व्हा' या संकल्पनेला यामुळे बळ मिळणार आहे.

याप्रसंगी डॉ. सुषमा पाटील यांनी प्रास्ताविक केले डॉ. दीप्ती कुऱ्हे यांनी आभार मानले.

> शिवाजी विद्यापीठाच्या इतिहासात माजी विद्यार्थ्यांसोबत इतक्या मोठ्या प्रमाणावर करार होण्याची ही पहिलीच वेळ आहे. आपल्याच विद्यार्थ्यांनी घडवलेल्या उद्योगांसोबत काम करणे ही विद्यापीठासाठी अभिमानाची गोष्ट आहे.
>
> **- डॉ. ज्योती जाधव**, प्रभारी प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

17 FEB 2026
सकाळ

# 'शिका - कमवा अन् 'शिकतानाच उद्योजक व्हा'

## उद्योजक माजी विद्यार्थ्यांसमवेत विद्यापीठाचा करार

कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान अधिविभागाने एकाचवेळी पाच यशस्वी माजी उद्योजक विद्यार्थ्यांसोबत सामंजस्य करार केला. या करारामुळे विद्यापीठातील चालू शैक्षणिक वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी संशोधनाच्या, रोजगाराच्या आणि प्रशिक्षणाची नवनवीन संधी उपलब्ध होणार आहेत. 'माझे विद्यार्थी, माझे संशोधक' या संकल्पनेवर आधारित अशा प्रकारचा सामंजस्य करार विद्यापीठामध्ये पहिल्यांदाच करण्यात आला.

या करारामुळे संशोधक विद्यार्थ्यांना प्रोत्साहन आणि प्रेरणा मिळणार आहे. हा महत्त्वपूर्ण करार विद्यापी ठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहामध्ये प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ . व्ही. एन. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. विद्यापीठाने ज्या पाच कंपन्यांसोबत हातमिळवणी केली आहे. त्या सर्व कंपन्यांचे नेतृत्व विद्यापीठाचेच माजी विद्यार्थी करत आहेत. अक्षय पाटील (कॅलस बायोटेक प्रायव्हेट लिमिटेड, कोल्हापूर), अजय अदाटे (ॲग्रिकॉस एक्सपोर्टस् प्रायव्हेट लिमिटेड, पुणे), डॉ. स्वप्नील पाटील (इकोझेनिथ टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड , कोल्हापूर), स्वप्नील देसाई (पेऑन लॅबोरेटरीज एलएलपी, को ल्हा पूर), डॉ. पराग कोळेकर (अल्फा नोवोबायोटिक्स, सांगली) यां च्याशी क रारामुळे विद्यार्थ्यांना या कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेता येणार आहे. विद्यापीठातील संशोधक आणि कंपन्यांचे तज्ज्ञ मिळून नव्या उत्पादनांव र संशोधन करतील. गुणवंत वि द्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण झाल्यानंतर या नामांकित कंपन्यांमध्ये रोजगाराची संधी मिळू शकेल. माजी विद्यार्थी आपल्या अनुभवातून सध्याच्या विद्यार्थ्यांना उद्योजकतेचे धडे देतील.

'शिका आणि कमवा' यासोबतच 'शिकतानाच उद्योजक व्हा' या संकल्पनेला यामुळे बळ मिळणार आहे. यावेळी डॉ. सुषमा पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. दीप्ती कुऱ्हे यांनी आभार मानले.



**शिवाजी विद्यापीठ :** जैवतंत्रज्ञान अधिविभागाने एकाचवेळी पाच यशस्वी माजी उद्योजक विद्यार्थ्यांसोबत सामंजस्य करार केला. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, आदी उपस्थित होते.